महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com | www.facebook.com/maharashtra.c.times | Info@maharashtracrimetimes.com | Twitter- @MHCrimeTimes | Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: १९ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १० ऑगस्ट २०२१ ते सोमवार १६ ऑगस्ट २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

# दोन मिनिटांत महाराष्ट्र पेटवू शकतो पण

## मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत संभाजीराजे कडाडले



**मुंबई (योगेश होळंब)- मराठा आरक्षणावरुन आंदोलन पुकारणारे भाजपा खासदार संभाजीराजेंनी पुन्हा एकदा लढा सुरु करण्याचा इशारा दिला आहे. आता पुढच मूक आंदोलन नांदेड येथे होणार असल्याचं संभाजीराजेंनी पुण्यामधील मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीमध्ये म्हटलं आहे. इतकच नाही तर संभाजीराजेंनी जुलै महिन्यात कोल्हापूरमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हापुरात छत्रपती शाहू महाराज यांची भेटी घेतल्यानंतर तर्कवितर्क लढवणाऱ्यांनाही आपल्या भाषणामधून चांगलाच टोला लगावला आहे. तसेच या भाषणात बोलताना त्यांनी आपण ही लढाई संयमाने लढत असल्याचं अधोरेखित केलं. दोन मिनिटांत महाराष्ट्र पेटवू शकतो पण आपल्याला ते करायचं नाही, असंही संभाजीराजे म्हणाले.**

मराठा आरक्षणासाठी मराठा क्रांती मोर्चाची भूमिका ही समांजस्याची असल्याचं संभाजीराजेंनी आपल्या भाषणात अधोरेखित केलं. यावेळी त्यांनी मतभेद विसरुन लोकं मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी एकत्र आल्याबद्दल समाधान व्यक्त केलं. दोन मिनिटांत महाराष्ट्र पेटवू शकतो पण आपल्याला ते करायचं नाहीय, असं सांगत संभाजीराजेंनी ही लढाई संयमानेच लढली जाईल असं स्पष्ट केलं. वर्षानुवर्षे जे लोक एकमेकांची तोंडं पाहत नव्हते ते आज या बैठकीच्या निमित्ताने एकत्र आले आहेत. आपल्याला अशाच एकजुटीने लढायचं आहे आणि मराठा समाजाला न्याया मिळून द्यायाचा आहे, असं संभाजीराजेंनी या बैठकीमध्ये सांगितलं.

चहा प्यायला म्हणजे विषय संपला असे होत नाही. अजित पवार कोल्हापूरला घरी जाऊन भेटले त्यावेळी अनेकजण म्हणाले. महाराज मॅनेज झाले वगैरेही चर्चा सुरु झाल्या, पण ज्या दिवशी मॅनेज होईल त्या दिवशी घरी बसेल जाऊन छत्रपती असे नाही मॅनेज होणार माझ्यावर विश्वास ठेवा, अशा शब्दांमध्ये संभाजीराजेंनी या भेटीवरुन टीका करणाऱ्यांना सुनावलं. मराठा आरक्षणावरुन राज्यात वातावरण तापलेलं असतानाच १४ जुलै रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हापुरात छत्रपती शाहू महाराज यांची भेट घेऊन संवाद साधला होता. करोना परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आलेल्या अजित पवारांनी सोमवारी कोल्हापुरातील नवीन राजवाडा येथे जाऊन शाहू महाराजांची भेट घेत चर्चा केली. अजित पवार आणि छत्रपती शाहू महाराज यांच्यात जवळपास एक तास बैठक सुरु होती. याच बैठकीनंतर ज्या चर्चा झाल्या त्यावरुन संभाजीराजेंनी टीकाकारांना आज मराठा मोर्चाच्या बैठकीमधील भाषणातून सुनावलं.

सामाजिक मागास सिद्ध केल्याशिवाय तुम्ही आरक्षणात काहीही करू शकणार नाही. ज्या लोकांना समाजाबद्दल काही माहिती आहे असे लोक सदस्य पाहिजेत, अशी मागणी संभाजीराजेंनी केली. माझी बाजू मांडण्याची भूमिका मी घेत आहे, आरक्षण अनेक दिवस चालेल पण आपल्या मागण्याच काय?, असा प्रश्न संभाजीराजेंनी उपस्थित केला. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री मंत्र्यांसोबत २२ मागण्यांसाठी बैठक झाली, मात्र अजून यात काहीच केलं नाही, आता सरकारने वसतिगृह बाबत जीआर काढून दाखवावा, आता दोन महिने झालेत, असंही संभाजीराजे म्हणाले.

आता काय करायचं? तुम्ही सांगा काय करायचं? दोन मूक आंदोलनं झाली तरी राजे शांत. महापूर आला म्हणून आम्ही थांबलो. दोन महिने झाले कोव्हिड परस्थिती सुधारते. पण तुम्ही मराठा समाजाचे एवढे आंदोलन झालं. त्यासाठी अजून एक आंदोलन करावे लागणार.

## थोडक्यात

### तीन वर्षांत भारतात अमेरिकेच्या दर्जाचे रस्ते पाहायला मिळतील

**मुंबई (विशाल पाटील)-** तीन वर्षांत भारतात अमेरिकेच्या दर्जाचे रस्ते पाहयला मिळतील, असं वक्तव्य रस्ते व परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे.सध्या भारतात दर दिवशी ३८ किमी लांबीचे रस्तेबांधणीचे काम होत आहे.



यापूर्वी दिवसाला केवळ २ किमी रस्तेबांधणी होत होती असा दावाही गडकरींनी केला. ते अहमदाबाद येथे एका कार्यक्रमात बोलत होते. देशातील रस्तेनिर्मितीच्या कामासाठी १५ लाख कोटी रुपये खर्च करणार असल्याची घोषणा काही दिवसांपूर्वीच करण्यात आली. मेट्रो, रेल्वे, विमानतळ यांसारख्या पायाभूत सुविधांसाठी गुंतवणूक करण्याची संधी आहे असंही नितीन गडकरी यांनी म्हटलं.

### राज कुंद्रानंतर शिल्पा शेट्टीलाही अटक होणार?; लखनऊ पोलीस मुंबईत दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)-** बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्राला पॉर्नोग्राफी प्रकरणात मुंबई पोलिसांनी अटक केलीय. राज कुंद्रा सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. राज कुंद्रा



विरोधात अनेक पुरावे हाती लागल्याने राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टीच्या अडचणीत चांगलीच वाढ झालीय. दरम्यान या कारवाईत राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टीची काही बँक खाती देखील सील सकरण्यात आली. राज कुंद्रा अटकेत असतानाच आता शिल्पा शेट्टीच्या अडचणीत अधिक वाढ झालीय.

### १० ऑगस्टला देशभरात बत्ती गुल होण्याची शक्यता? इंजिनिअर्सने दिला इशारा

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)-** केंद्र सरकारने संसदेच्या चालू मान्सून सत्रात वीज (सुधारणा) विधेयक, २०२१ मांडणार आहे. या विरोधात देशभरातील लाखो कर्मचाऱ्यांनी संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. देशभरात म्हणजेच



१० ऑगस्ट रोजी पावर कट होऊ शकतो. ऊर्जा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी आणि इंजिनिअर्सने संसदेच्या चालू मान्सून सत्रात वीज (सुधारणा) विधेयक, २०२१ मांडण्याच्या विरोधात १० ऑगस्टरोजी संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. पीटीआयच्या वृत्तानुसार अखिल भारतीय विद्युत अभियंता संघाने ही माहिती दिली आहे.

## काँग्रेसपाठोपाठ आता राष्ट्रवादीचाही निवडणुकीत स्वबळाचा नारा?

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** गेल्या काही दिवसांपासून स्वबळाचा नारा आणि महाविकास आघाडीतील कथित फूट हे दोन विषय चर्चिले जात आहेत. सुरुवातीला काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महापालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींसाठी स्वबळाचा नारा दिला. त्यावेळी महाविकास आघाडीतील इतर दोन पक्ष मात्र नाराजीचा सूर आळवत होते. पण आज राष्ट्रवादीचे नवाब



मलिक यांनी एक सूचक विधान केल्याने आता राष्ट्रवादीही स्वबळाचा नारा देत आहे की काय अशा चर्चा रंगल्या आहेत. 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका एकत्र लढवल्या पाहिजेत अशी कुठल्याही पक्षाची भूमिका नाही. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आहे. पण असं जरी असेल तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका या एकत्रित येऊनच लढवल्या गेल्या पाहिजेत अशी भूमिका कोणत्याच पक्षाची नाही.

## ठाणे जिल्ह्यात उपाहारगृहे बेमुदत बंद

**ठाणे (तृप्ती गोरे):** राज्य शासनाच्या निर्देशानुसार ठाणे जिल्ह्यात निर्बंध शिथिल करताना जिल्हा प्रशासनाने उपहारगृहांना वाढीव वेळांचा दिलासा दिलेला नसून यामुळे संतापलेल्या उपाहारगृह व्यावसायिकांच्या संघटनेने येत्या सोमवारपासून संपूर्ण जिल्ह्यात घरपोच सुविधेसह उपाहारगृहे बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. उपाहारगृहांना भाजीपाल्याचा पुरवठा होऊ नये आणि ऑनलाईन सुविधेद्वारे उपाहारगृहातून नागरिकांना खाद्य पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी काम बंद ठेवावे, यासाठी संघटनेने आतापासून प्रयत्न सुरु केले आहेत. उपहार संघटनेने घेतलेल्या निर्णयाचा फटका उपाहारगृहांच्या खानावळीवर अंवलंबून असलेल्या नागरिकांना बसणार असून यामुळे अनेकांचे हाल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी नवा आदेश



काढून जिल्ह्यातील काही निर्बंध शिथिल केले. त्यामध्ये अत्यावश्यक सेवेसह इतर दुकानांच्या वेळा वाढविण्यात आल्याने व्यापाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. असे असले तरी उपाहारगृहांना कोणताही दिलासा देण्यात आलेला नसल्यामुळे या व्यावसायिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. यापुर्वी जिल्ह्यात सोमवार ते शुक्रवार या दिवशी दुपारी ४ वाजेपर्यंत उपाहारगृहे सुरु ठेवण्यास आणि त्यानंतर घरपोच सेवेस परवानगी होती.

## निर्बंध कडक करा पण, विकेंड लॉकडाउन हटवाच!

**बेळगाव (सतिश सोनावणे)-** राज्य सरकारने जिल्ह्यात अचानकपणे सुरु केलेल्या लॉकडाउनचा फटका व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर बसला आहे. बेळगावात कोरोना रुग्णांची संख्या खूपच कमी आहे. यामुळे हवे तर निर्बंध कडक करा. पण, शहरातील विकेंड लॉकडाउन हटवा, अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे. राज्य सरकारने बेळगावसह



राज्यातील काही जिल्ह्यात शुक्रवारपासून (६) नाईट कर्फ्यू व वीकेंड लॉकडाऊन जाहीर केले. त्याची अंमलबजावणीही केली जात आहे. मात्र, याचा मोठा फटका व्यापाऱ्यांना बसला आहे. शहरातील व्यापारी आधीच्या लॉकडाउनमधून आता कुठे सावरत आहेत. त्यातच पुन्हा लॉकडाउन केल्यामुळे व्यापारी त्रासले आहेत. सण, उत्सव तोंडावर आहेत. या पार्श्वभूमीवर आठ दिवस आधी खरेदी केली जाते. नागपंचमीचा सण १३ रोजी आहे. त्यानंतर रविवारी (१५) स्वातंत्रदिन असून पुढील रविवारी (२२) रक्षाबंधन आहे. त्यानंतरही अनेक सण व उत्सव आहेत. बाजारपेठेत शनिवारी व रविवारी मोठी गर्दी असते. यातून व्यापारही चांगला होतो. बेळगावात सध्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच रुग्ण आढळून येत आहेत. तसेच जिल्ह्याला लागून असलेल्या सर्व सीमांवरही कडक तपासणी केली जात आहे. त्यामुळे, बेळगावात रुग्णसंख्या वाढण्याचा धोका नाही. वीकेंड लॉकडाउनमुळे शहरातील मुख्य बाजारपेठेला मोठा फटका बसला आहे. त्यात अजून वाढ होऊ शकते. या घाईगडबडीत घेतलेल्या निर्णयामुळे अनेक अडचणी येऊ शकतात. याचा विचार करुन सरकारने जिल्ह्यातील लॉकडाऊन हटवावा, अशी मागणी व्यापारी करत आहेत. 'जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची संख्या कमी आहे. तरीही अचानकपणे लॉकडाउन करण्यात आले आहे. याचा फटका व्यापाऱ्यांना बसला आहे. सरकारने नियम कडक करावेत व वीकेंड लॉकडाउन हटवावा.'

## खेलरत्न पुरस्काराचे नामकरण म्हणजे राजकीय खेळ; शिवसेनेची मोदी सरकारवर टीका

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नुकतंच राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराचे नाव बदलून मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार असं नामकरण केले आहे. याबाबत माहिती पंतप्रधान मोदींनी ट्विटच्या माध्यमातून दिली होती. राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराचे 'मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार' असं नामकरण केल्याने यावरून आता शिवसेनेनं सामनातून प्रतिक्रिया दिली आहे. खेलरत्नचं पुरस्काराचे नामकरण म्हणजे केंद्र सरकारचा हा राजकीय खेळ असल्याची टीका शिवसेनेच्या सामानातून केली आहे. पंतप्रधान मोदी आणि दिवंगत जेटलींचं नाव क्रिकेट स्टेडियमला दिलं गेलंय, त्यांनी क्रिकेटमध्ये अशी



कोणती कामगिरी केली होती?, असा सवाल देखील सामना अग्रलेखातून शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केलाय. केंद्र सरकारने हा राजकीय खेळ केला. या राजकीय खेळाने अनेकांची मने दुखावली आहेत, असं शिवसेनेनं सामनाच्या अग्रलेखातून केंद्रावर टीकेची झोड उठवली आहे. दरम्यान, पुढं सामनातून असं सांगण्यात आलं आहे की, मोदी सरकारचे म्हणणे आहे की, ध्यानचंद यांच्या नावाने पुरस्कार देणे ही लोकभावना आहे.

परंतु, राज्य हे सूडाने, द्वेषाने चालवता येत नाही हीसुद्धा एक लोकभावना आहे. आणि त्या भावनेची दखल घ्यावीच लागेल, असा महत्त्वाचा मुद्दा संजय राऊत यांनी सामनातून स्पष्ट केला आहे.

## 'मिठी' ला नदीचे मूळ स्वरूप प्राप्त करून देणार - पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** गाळ काढणे, तरंगता कचरा वेगळा करणे तसेच आजूबाजूने येणारे घाण पाणी रोखणे या तीन टप्प्यांमध्ये काम करून 'मिठी' ला नदीचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. याकामी सर्वांचे सहकार्य गरजेचे असल्याचे प्रतिपादन पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी केले.

मिठी नदी स्वच्छतेच्या पायलट प्रकल्पाचे उद्घाटन श्री. ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. यावेळी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, एमएमआरडीएचे आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास आदी उपस्थित होते.

एमएमआरडीए आणि मरीन डेब्रिज पार्टनरशिप यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार आज हा प्रकल्प सुरू करण्यात



आला. या प्रकल्पात नदीतील तरंगता कचरा गोळा करून त्याचे वर्गीकरण केले जाईल. याद्वारे नदीमार्गातून समुद्रात जाणारा प्लास्टिक आणि इतर तरंगता कचरा कमी केला जाणार आहे. मागील काही वर्षात मिठी नदीला नाल्याचे स्वरूप आले आणि पावसाळ्यात नागरी वस्तीला धोका निर्माण झाला. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे किनाऱ्यावरील नागरिकांचे स्थलांतर करावे लागले. मिठी नदीची स्वच्छता हा एक नियमित प्रक्रियेचा भाग आहे, तथापि आता त्यावर भागणार नाही. पर्यावरणाच्या दृष्टीने आणि मुंबईकरांच्या सुरक्षिततेसाठी नाल्याचे स्वरूप आलेल्या मिठीला पुन्हा नदीचे स्वरूप प्राप्त करून देणे गरजेचे आहे, असे श्री.ठाकरे म्हणाले. नदीतील गाळ काढणे, तरंगता कचरा वेगळा करणे आणि आजूबाजूच्या परिसरातून येणारे घाण पाणी रोखणे या तीन टप्प्यांवर काम करणे आवश्यक आहे. किनाऱ्यावरील नागरिकांची काळजी घेऊन हे काम करावे लागणार असल्याने थोडा वेळ लागला तरीही मिठी कायमस्वरूपी स्वच्छ व्हावी यासाठी नागरिकांचे सहकार्यही महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येकाने मिठीला स्वच्छ ठेवण्यासाठी आपल्यापासून सुरूवात करून शासकीय यंत्रणांच्या प्रयत्नांना सहकार्य करावे, असे आवाहन श्री ठाकरे यांनी केले.

## नकली दुधाच्या रॅकेटचा पर्दाफाश, डिटर्जंड पावडरपासून बनलेलं १० हजार लिटर सिंथेटिक दूध जप्त

**मथुरा (प्रथमेश चव्हाण)-** डिटर्जंट पावडर आणि घातक केमिकलचा वापर करून तयार करण्यात येणाऱ्या नकली दुधाच्या रॅकेटचा पोलिसांनी पदार्फाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी ७ जणांना अटक केली असून १० हजार लिटर विषारी, सिंथेटिक दुधाचा टँकरही जप्त केला आहे. अशी झाली कारवाई उत्तर प्रदेशातील मथुरेत एक टोळी डिटर्जंट पावडर, बटाटे, रिफाइन्ड तेल आणि केमिकल यांचा वापर करून नकली दूध तयार करत



असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी मथुरेजवळच्या जुगसना गावात संध्याकाळच्या वेळी छापा टाकला. यावेळी या विषारी दुधाचा व्यवसाय करणाऱ्या ७ जणांना पोलिसांनी अटक केली. नकली दूध बनवणारी ही टोळी स्किम्ड मिल्क पावडरमध्ये पाणी मिसळून एक द्रावण तयार करत असे. त्यानंतर ते मिश्रण गरम करून त्यात रिफाइन्ड ऑईल आणि डिजर्जंट पावडर टाकत असे.

## सायबर गुन्हेगारांचे धाडस वाढले; चक्क पोलीस आयुक्तांच्या नावाने फेक फेसबुक अकाउंट

**नागपूर (शकिल शेख)-** सायबर गुन्हेगारांची Cyber Crime मजल आता खूप दूर पर्यंत गेली आहे. आता सायबर गुन्हेगारांनी चक्क नागपूर पोलीस विभागाचे प्रमुख पोलीस आयुक्तांच्या नावाने एक फेक फेसबुक अकाऊंट तयार करून पैशाची मागणी केली आहे. सायबर गुन्हेगाराने थेट पोलीस आयुक्तांना टार्गेट केल्यामुळे पोलीस विभागात मोठी खळबळ उडाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर उपाध्यक्ष रूपेश पन्नासे यांना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या नावाने फेसबुकवरून फ्रेंड रिक्वेस्ट आली आणि त्यांनी ती रिक्वेस्ट स्विकारली. दुसऱ्या दिवशी त्यांना पोलीस आयुक्तांच्या फेसबुकवरून




मॅसेज आला. हॅलो कसे आहात? त्यानंतर दुसऱ्या मॅसेजमध्ये थेट एक मदत हवी आहे करू शकणार का? अशी विचारणा केली. त्यावर रुपेश यांनी उत्तर देताच पैश्यांची मागणी केली. त्यामुळे रूपेशला थोडा संशय आला. त्यांनी लगेच पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना फोन केला आणि त्यांच्या नवे एक फेक फेसबुक अकाऊंट तयार झाल्याची माहिती दिली. पोलीस आयुक्तांनी प्रकरणाला गांभीर्याने घेत सायबर गुन्हे शाखेला याबाबत चौकशीचे आदेश दिले.



संपादक:- राकेश शंकर गोरे

# रोजगार कात्रीत, विकास कोंडीत

**कोरोनाने विस्कटलेली आर्थिक घडी सावरण्यासाठी शहरी आणि ग्रामीण अशा दोन्हीही भागातील रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन दिले पाहिजे. पायाभूत सुविधांमधील कामांना वेग देणे आणि वस्तुनिर्मिती उद्योगाच्या वाटचालीतील अडचणी दूर करणे आवश्यक आहे.**

कोरोना महासाथीने देशाच्या सर्व क्षेत्रांमध्ये मोठी उलथापालथ घडत आहे. अनेक उद्योग नव्याने मंदीच्या छायेत आलेले आहेत. देशातील बेरोजगारी सहा टक्क्यांहूनही अधिक अशा विक्रमी पातळीला पोचलेली आहे. साधारणपणे तीन टक्के बेरोजगारीचा दर हा सामान्य मानला जातो. रोजगारासंबंधी नवी सांख्यिकी माहिती हाती आली असून त्यानुसार अनेक नव्या समस्या डोके वर काढत आहेत. आतापर्यंत सर्वसाधारण समजूत अशी होती की, बेरोजगारी मुख्यतः असंघटित, कंत्राटी, तात्पुरत्या, असुरक्षित आणि पगारी नोकरीत नसलेल्या मजूर वर्गाबाबतच आहे. पण पगारी रोजगारातही लक्षणीय घट झाल्याचे दिसत आहे. २०१९-२० मध्ये देशात सुमारे ८.६ कोटी असलेल्या पगारी नोकरदारांच्या संख्येत १ कोटीने घट होऊन ती सुमारे ७.६ कोटी झाली आहे. ही घट शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागात झाली. उलट ग्रामीण भारतात एकूण पगारी रोजगार जरी ४२ टक्के असला तरी तेथील रोजगार घट ६२ टक्के इतकी जास्त आहे. शहरी भागात एकूणपैकी ५८ टक्के रोजगार आहे, घट मात्र ३८ टक्के आहे. कोरोना काळात ग्रामीण भागाने बेरोजगारीचे तुलनेने अधिक ओझे सहन केलेले दिसते. संकटात देशाला अन्नधान्य, भाजीपाला, गरजेच्या वस्तू सुरळीतपणे पुरवणाऱ्या ग्रामीण भागावर हा एक प्रकारचा अन्यायच आहे.

भारताचा श्रम बाजारात सहभागी होण्याचा दर नुकताच जाहीर झाला. तो अंदाजे ४० टक्के आहे. जागतिक मानकानुसार तो निदान ६० टक्के असायला हवा. चीनमध्ये तो ७६ टक्के आहे. रोजगार निर्माण होण्यासही किती मोठा वाव आहे, हे यावरून स्पष्ट होते. गेल्या वर्ष-दीड वर्षात लक्षात आलेली ठळक घडामोड म्हणजे शहरी भागातून ग्रामीण भागाकडे मोठ्या प्रमाणावर झालेले मजुरांचे स्थलांतर. आतापर्यंतचे स्थलांतर बहुधा ग्रामीणकडून शहरी भागात व्हायचे. पण शहरी भागातील लहान मोठे कारखाने, बांधकाम व्यवसाय, किरकोळ विक्री, दुकानदारी हे बहुतांशी बंद असल्याने नाईलाजाने हे उलट दिशेने स्थलांतर झाले. स्थलांतर




मुख्यत्वेकरून गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, दिल्ली येथून उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, उत्तराखंड, राजस्थान, तेलंगणा, प. बंगाल या राज्यांमध्ये झाले. बिगरशेती क्षेत्रातील लोकांची ग्रामीण भारतातील शेती व तत्सम उद्योगांमध्ये गर्दी केलेली आढळते. अर्थात हे अटळच होते. कोरोनाची दुसरी लाट येऊन गेली असली तरी यात फार मोठा फरक पडलेला नाही. शिवाय तिसऱ्या लाटेची भीती आहेच. तेव्हा रोजगार वाढवण्यासाठी आणि पूर्वीसारखा शहरी-ग्रामीण समतोल पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी अगदी अभिनव आणि अपारंपरिक मार्ग शोधणे भाग आहे.

### निर्मिती उद्योगातील आव्हाने

मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणे आणि तो टिकवणे ही गोष्ट सोपी नाही. केंद्र सरकार, राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था अशा सर्व पातळ्यांवर व्यवस्थित व कालबद्ध नियोजनाने हे साधावे लागेल. त्यातूनच गरिबी आणि विषमतेचे निर्मूलन, प्रादेशिक समतोल, सामाजिक न्याय, आर्थिक स्थैर्य ही मूलभूत उद्दिष्टे साधायची असतात. त्यासाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्र यांच्यात ताळमेळ ठेवावा लागेल. उद्दिष्टे आणि त्यानुसार कार्यवाही यांच्यात एकसूत्रता असणे आवश्यक असते. सध्या या मुद्द्याकडे दुर्लक्ष होते असे दिसते. त्यातही मुख्य जबाबदारी सरकारवरच पडते. आजमितीस सरकारचे लक्ष फक्त आपत्ती निवारणावरच आहे. राज्य कारभार चालवणे, आवश्यक सेवांवर खर्च करणे, पगार-निवृत्तीवेतन भागवणे, आरोग्य सेवांवर खर्च करणे, नैसर्गिक आपत्तींना तोंड देणे हेच प्राधान्याने होत आहे. ते योग्यच आहे, थांबवताही येणार नाही. पण सरकारने सध्या भांडवली गुंतवणूक आणि भांडवली प्रकल्प स्थगित ठेवले आहेत किंवा त्यांना कात्री लावली आहे. आता त्यावर व विशेष करून ग्रामीण भागातील भांडवली कामांवर लक्ष देऊन अर्थव्यवस्थेला उत्तेजन देणे अपरिहार्य आहे. रोजगार निर्मितीची जास्त क्षमता असणारे उद्योग, प्रकल्प, क्षेत्रे प्राधान्याने डोळ्यासमोर ठेवणे गरजेचे आहे.

शहरी भागात मुख्यतः सेवा क्षेत्र असते आणि त्याची रोजगार निर्मितीची क्षमता तुलनेने मर्यादितच असते. त्यामुळे ग्रामीण भागातील साधनसंपत्ती, मनुष्यबळ यांचा अधिक कल्पकतेने उपयोग करून रोजगारावर लक्ष देणे क्रमप्राप्त आहे. नव्या रोजगाराने नवे उत्पन्न, बचती, गुंतवणुका, उत्पादन, रोजगार असे चक्र चालू राहते. देशात गेल्या काही वर्षात सेवा क्षेत्राकडे लक्ष देताना वस्तूनिर्माण क्षेत्राकडे दुर्लक्ष झाले ही वस्तुस्थिती आहे. समुचित तंत्रज्ञान वापरून छोटे उद्योग, यंत्रांचे सुटे भाग, दुरुस्ती, लहानमोठी यंत्रे, पूरक उद्योग असे उपक्रम उत्पादन आणि रोजगार यांना चालना देतात. अल्प प्रशिक्षण देऊन अशा उपक्रमांमध्ये मोठा रोजगार सामावला जाऊ शकतो. सूक्ष्म, लघु, मध्यम क्षेत्रातील उद्योगांमध्ये याची मुबलक क्षमता आहे. पण जुने तंत्रज्ञान, सदोष व्यवस्थापन, अपुरा वित्त पुरवठा, अल्प उत्पादकता, औद्योगिक आजारपण यामुळे हे क्षेत्र आज तितकेसे यशस्वी दिसत नाही. कोरोना संकटाच्या काळात त्यांची अधिकच फरफट झाली. पण रोजगार निर्मितीसाठी त्यावर लक्ष केंद्रित करणे भाग आहे.

### भर ग्रामीण रोजगारावर

ग्रामीण पायाभूत सुविधा पुरवण्याच्या कामात भरपूर रोजगार वापरता येतो. रस्ते, पूल बांधणी, दुरुस्ती, विहिरी, नाले यांचे खोदकाम, खोलीकरण, बंधारे घालणे अशा पारंपरिक पायाभूत कामांकडेच पुन्हा वळावे लागणार आहे. या कामांचे नियोजन खेडे, तालुका आणि जिल्हा पातळीवर करावे लागणार. त्यासाठी योग्य मार्गदर्शन, वित्त पुरवठा, प्रशासकीय पाठबळ याची राज्य आणि केंद्र पातळीवरील अधिकार मंडळांनी व्यवस्था करायची आहे. या सुसूत्रतेचा आणि सामंजस्याचा आपल्याकडे अभाव आहे, असा अनुभव येतो. ती मरगळ व त्रुटी दूर करावी लागेल. ग्रामीण विकास म्हणजे फक्त शेतीचा विकास असा एकांगी अर्थ आपल्याकडे कित्येकदा घेतला जातो. ती भूमिका बदलायला हवी. आरोग्य, वाहतूक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, विपणन सेवा, पुरवठा साखळी सेवा, स्थानिक प्रशासन यंत्रणा, सल्ला सेवा, वित्तीय सेवा यांची ग्रामीण भागातही नितांत गरज आहे, हे वेगळे सांगायला नको. आतापर्यंत त्यांचा शास्त्रशुद्ध आणि गंभीर असा विचार झालेला नाही.

# नोकरदारांना वाढीव प्रवास खर्चाचा भुर्दंड

**विरार (आकाश कांबळे):** करोना प्रादुर्भावाच्या दुसऱ्या लाटेचा प्रभाव कमी होत असताना शासनाकडून टाळेबंदीचे नियम शिथिल केले जात आहेत; पण अजूनही रेल्वेने प्रवास करण्याची मुभा मात्र सामान्य नागरिकांना देण्यात आली नाही. तर दुसरीकडे सर्वच प्रकारची कार्यालये सुरू झाली असून कर्मचाऱ्यांना कामावर रुजू होण्यासाठी सक्ती केली जात आहे. त्यात शासकीय प्रवासाची साधने उपलब्ध नसल्याने चाकरमान्यांना दररोज शेकडो रुपये खर्च करून आपल्या कामावर जावे लागत आहे. निम्म्याहून अधिक पगाराचे पैसे केवळ प्रवास खर्चावर जात असल्याने चाकरमान्यांच्या आर्थिक अडचणी वाढत चालल्या आहेत.



मागील वर्षी करोना महासाथीचा शिरकाव झाल्यावर शासनाकडून सामान्य नागरिकांसाठी रेल्वे सेवा बंद करण्यात आली आली होती ती आजतागायत बंद आहे. शासनाकडून अनके वेळा केवळ आश्वासने देण्यात आली; पण अजूनही याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही; पण अर्थचक्राला गती प्राप्त व्हावी म्हणून राज्य शासनाकडून टाळेबंदीचे निर्बंध शिथिल करून सर्वच आस्थापनांना काही नियम घालून परवानगी दिली आहे. यामुळे चाकरमान्यांना कामावर जावे लागत आहे. यामुळे नागरिकांना खासगी वाहनांच्या साहाय्याने अधिक प्रवास खर्च करून कामावर जावे लागत आहे. त्यात इंधनाचे दर वाढल्याने खासगी प्रवासी सेवेचे दरसुद्धा वाढले आहेत. कमाईची अधिकतर रक्कम केवळ प्रवासावर खर्च होत आहे; पण हातचे काम जाऊ नये म्हणून चाकरमानीसुद्धा आर्थिक झळा सोसत आपला संसाराचा गाडा हाकत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार शिवशाही बसचे नालासोपारा बस डेपोमधून बोरिवलीपर्यंत प्रतिफेरी तिकीट दर ९० रुपये आहेत, तर चर्चगेटपर्यंत १४५ रुपये प्रतिफेरी आहे. एसटी सेवेचे दर नालासोपारा डेपोमधून बोरिवलीपर्यंत प्रतिफेरी ६० रुपये आहेत, तर चर्चगेटपर्यंत ९० रुपये आहेत. तसेच ओला आणि उबेरचे दर वसई-विरारमधून बोरिवलीपर्यंत ६०० ते ७०० रुपये आहेत, तर चर्चगेटपर्यंत १५०० रुपये आहेत. खासगी रिक्षा सेवा वसई-विरार ते बोरिवली ५०० रुपये, तर वसई-विरार ते चर्चगेट १३०० ते १५०० रुपये आहेत. तर लोकल रेल्वे सेवेचे दर वसई-विरार ते बोरिवली १० रुपये, तर वसई विरार ते चर्चगेट ३० रुपये आहेत. अर्थात दर परवडत नसल्यामुळे नागरिक समूहाने प्रवास करतात.

# कडोंमपाकडे १२८ कोटी मालमत्ता कर जमा

**ठाणे (शकिल शेख):** जुलैअखेरपर्यंत करदात्याने त्यांचा मालमत्ता कर पूर्ण भरला, तर कल्याण-डोंबिवली पालिकेने अशा करदात्यांना मालमत्ता करात पाच टक्के सूट दिली होती. कर भरण्यासाठी ऑनलाइन, रोख, धनादेशाद्वारे सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. या सुविधांचा पुरेपूर लाभ घेत करदात्यांनी एप्रिल ते जुलैअखेरपर्यंत पालिकेच्या तिजोरीत १२८ कोटी ४७ लाख रुपये भरणा केले आहेत, अशी माहिती पालिकेच्या मालमत्ता कर विभागातील उच्चपदस्थाने दिली. मागील वर्षी याच कालावधीत पालिका तिजोरीत मालमत्ता करापोटी ८२ कोटी ७२ लाख रुपये जमा झाले होते.



# करोनामुळे पर्यावरणपूरक गणेशमूर्तींच्या मागणीत वाढ

**ठाणे (तृप्ती गोरे):** गेल्यावर्षी करोना प्रादुर्भावामुळे अनेकांनी गणेशमूर्तीचे विसर्जन घरच्या घरी करण्यास प्राधान्य दिले होते. यासाठी अनेकांनी पर्यावरणपूरक मूर्तीची स्थापना केली होती. यंदाही करोनाचा प्रादुर्भाव कायम असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक मंडळांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या मूर्तींच्या मागणीत २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे, अशी माहिती गणेशमूर्तिकारांनी दिली. करोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्या वर्षी राज्य शासनाने पर्यावरणपूरक मूर्तींची स्थापना करावी आणि मूर्तीचे विसर्जन घरच्या घरी करावे, असे आवाहन जनतेला केले होते. जेणेकरून विसर्जनाच्या ठिकाणी नागरिकांची गर्दी होणार नाही. यामुळे गेल्यावर्षी अनेकांनी शाडूमातीच्या मूर्तीची स्थापना केलेली पाहायला मिळाली. दरवर्षी मुंबईसह,



ठाणे जिल्ह्यात रायगड, पेण तर काही प्रमाणात पुण्याहून गणेशमूर्ती विक्रीसाठी येत असतात. पेणहून जवळजवळ १०० टक्के मूर्ती ठाणे जिल्ह्यात विक्रीसाठी दाखल होत असतात. यंदा आतापर्यंत ७५ टक्के मूर्ती विक्रीसाठी दाखल झाल्या असून यामध्ये २५ टक्के शाडू माती तर, ५० टक्के प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींचा समावेश आहे, अशी माहिती पेणमधील गणेशमूर्ती कारखानदार आशीष मांडलेकर यांनी दिली.

करोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर अनेक गणेशभक्तांनी पर्यावरणपूरक मूर्तीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला असून गणेशमूर्तीचे विसर्जन हे घरच्या घरी करण्यास ते प्राधान्य देणार आहेत. यंदा सार्वजनिक गणेश मंडळांनाही सरकारने चार फूट मूर्तीची स्थापना करण्याची मर्यादा घालून दिल्याने अनेक मंडळानी यंदा शाडू मातीच्या मूर्तीची स्थापना करण्याचे ठरविले आहे.

# एमआयडीसीला अतिक्रमणांचा विळखा

**नवी मुंबई (धनश्री सट्टा):** ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीत पायाभूत सुविधांशिवाय गंभीर समस्या आहे ती अतिक्रमणाची. या वसाहतीत १२७ हेक्टरवर अतिक्रमण असून यात सात मोठ्या झोपडपट्ट्या व ९५ पेक्षाअधिक बेकायदा इमारती आहेत. त्यामुळे या वसाहतीला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. नियोजित नवी मुंबई शहरालाही यामुळे भविष्यात फटका बसणार आहे.



विशेष म्हणजे नवी मुंबई महापालिकेत एकूण १११ नगरसेवकांपैकी १५ नगरसेवक हे बेकायदा वसाहतीतून निवडून येतात. पावणे व महापे गाव वगळता सर्व वसाहती या बेकायदा आहेत. या शिवाय देशभर गाजलेले ९९ बेकायदा इमारत प्रकरणातील ९५ इमारती या एमआयडीसीच्या जागेवरवरच असून यापैकी केवळ ५ इमारतींवर कारवाई करण्यात आली आहे. तर ११ हेक्टरवर उभारलेल्या बावखळेश्वर मंदिरावरही कारवाई करण्यात आली आहे.

या परिसरात राजकीय वरदहस्ताने इलठणपाडा, राम नगर, ईश्वर नगर, विष्णू नगर, तुर्भे स्टोअर, चिंचपाडा, इंदिरा नगर, यादव नगर, महापे अशा अनेक झोपडपट्ट्या वसल्या असून त्या दिवसेंदिवस विस्तारत आहेत. ही अतिक्रमणे ही शहरासाठीही मोठी गंभीर समस्या होत आहेत. मात्र याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. येथील यादवनगर झोपडपट्टीत गेल्यावर आपण महाराष्ट्रात आहोत का हेही विसरून जायला होते. काही वर्षांपूर्वी या ठिकाणाहून एकच नगरसेवक निवडून येत असे आता दोन नगरसेवक निवडून येतील ऐवढी लोकसंख्या झाली आहे. या ठिकाणी किमान १ लाख मतदार व सहा लाख लोकवस्ती असल्याची माहिती महापालिकेतील एका अधिकाऱ्याने दिली. तर संपूर्ण एमआयडीसीतील तब्बल १२७ हेक्टर जमिनीवर अतिक्रमण झाल्याचा दावा माहिती अधिकार कार्यकर्ते राजीव मिश्रा यांनी केला आहे.

झोपडपट्टी काही ठिकाणी वाढल्या आहेत. पावसाळा संपल्यावर त्यावर कारवाई करण्यात येणार आहे. इमारतींचे प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने न्यायालयाच्या आदेशाने कारवाई करण्यात येईल. कंपन्यांचे अतिक्रमण अद्याप निदर्शनास आले नाही जर निदर्शनास आले तर त्यावरही कारवाई करण्यात येईल असे गेल्या आठवड्यात तत्कालीन कार्यकारी अभियंता एम.एस.कलकुटकी यांनी आश्वासन दिले होते. मात्र आता त्यांच्या जागी नवीन अधिकारी आले आहेत. त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

डोळ्यादेखत बेकायदा वसाहती वाढत असताना एमआयडीसी प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे. न्यायालयाने आदेश दिल्यानंतरही त्वरित कारवाई केली जात नाही. यामुळे दिघ्यातील रेल्वेच्या धरणापर्यंत अतिक्रमणे वाढत गेली आहेत. ही बाब एमआयडीसीच्या निदर्शनास आणून दिली असूनही त्यावर काही कारवाई होत नाही, अशी खंत मनसेचे ऐरोली विधानसभा अध्यक्ष निलेश बाणखिले यांनी व्यक्त केली. एमआयडीसी अतिक्रमणाबाबत नक्की काय करते हा मोठा प्रश्न आहे. हाकेच्या अंतरावर नियोजित शहर आहे आणि एमआयडीसीत कुठलेच नियोजन नाही. अतिक्रमणांवर कारवाई करण्याची इच्छाशक्तीच नसल्याने हा पेच निर्माण झाला आहे.

# तिसऱ्या लाटेसाठी प्रशासन दक्ष

**ठाणे (दिगंबर जाधव)-** करोनाच्या दुसऱ्या लाटेचा अनुभव लक्षात घेऊन संभाव्य तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी रुग्ण उपचाराच्या खाटांची संख्या वाढविण्याबरोबरच प्राणवायूच्या पुरवठ्यात तिप्पटीने वाढ करण्याचे नियोजन ठाणे जिल्हा प्रशासनाने आखले आहे. या नियोजनानुसार रुग्ण उपचार खाटांच्या संख्येत दोन ते अडीच हजाराने वाढ होणार असून त्याचबरोबर प्राणवायूचा पुरवठा ६५७ टन केला जाणार आहे. खासगी रुग्णालयांमध्ये प्राणवायूचा तुटवडा निर्माण झाल्यास त्यांना जम्बो सिलेंडरच्या माध्यमातून प्राणवायूचा पुरवठा केला जाणार आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून दोन हजार जम्बो सिलेंडर खरेदी करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, सर्वच खासगी रुग्णालयांना प्राणवायू पुरवठ्याबाबत कंपन्यांशी करार करण्याच्या सूचनाही



जिल्हा प्रशासनाने दिल्या आहेत. ठाणे जिल्ह्यात सध्या दररोज २५० ते ३०० करोनाबाधित आढळून येत आहे. दुसरी लाट ओसरली असली तरी आरोग्य विभागाने करोनाच्या तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तविली आहे. यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी नियोजन आखले आहे. दुसऱ्या लाटेमध्ये रुग्ण उपचारादरम्यान जाणवलेल्या उणिवा तसेच प्राणवायूचा तुटवडा हे सर्व लक्षात घेऊन हे नियोजन आखण्यात आले आहे. दुसऱ्या लाटेमध्ये जिल्ह्यात ८६ हजारांच्या आसपास सक्रिय रुग्ण होते. त्यापैकी १२ टक्के म्हणजेच १० हजार ४०७ रुग्णांना प्राणवायूची आवश्यकता भासत होती. त्यातील २५ टक्के म्हणजेच २६०० रुग्ण अतिदक्षता विभागात उपचार घेत होते. उर्वरित रुग्ण प्राणवायूच्या खाटांवर उपचार घेत होते. त्या वेळेस जिल्ह्यात २१९ टन प्राणवायूचा पुरवठा केला जात होता.

# घरांचे हप्ते भरण्यास पुन्हा मुदतवाढ?

**नवी मुंबई (धनश्री सट्टा):** सिडकोच्या महागृहनिर्मितीतील घरांचे हप्ते व देखभाल खर्च भरण्यास देण्यात आलेली ३१ जुलै ही मुदत संपलेली असून यात आणखी काही काळ मुदतवाढ देण्यासंदर्भात सिडको प्रशासन प्रस्ताव तयार करीत आहे. काही हप्ते भरलेले आहेत आणि शिल्लक हप्ते भरण्यास लाभार्थी तयार असतील तर आणखी काही



दिवस हे हप्ते व देखभाल खर्च भरण्यास ग्राहकांना मुदतवाढ देण्यास हरकत नाही असे सिडकोतील उच्च अधिकाऱ्यांनी एका बैठकीत मत व्यक्त केल्याचे समजते. ही मुदतवाढ दोन महिने मिळण्याची शक्यता आहे. ३१ जुलैपर्यंत किती लाभार्थीनी घरांची सर्व रक्कम भरली याची माहिती देण्यास सिडको प्रशासनाने नकार दिला. यामुळे हप्ते भरण्याची संख्या कमी होते असा दावा केला गेला आहे.

सिडकोने खारघर, तळोजा, कळंबोली, घणसोली आणि द्रोणागिरी येथे २५ हजार घरांचे बांधकाम सुरू केले आहे. केंद्र सरकारच्या सर्वासाठी घरे या संकल्पनेची पूर्तता राज्य शासन म्हाडा व सिडकोच्या माध्यमातून करीत असून सिडकोने दोन लाख घरे बांधण्याचा संकल्प केला होता, पण काही तांत्रिक आणि आर्थिक अडचणीमुळे ही संख्या ६५ हजारांपर्यंत मर्यादित ठेवण्यात आली आहे. त्यातील २५ हजार घरांचे बांधकाम व सोडत या दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी पूर्ण केल्या जात आहेत. या २५ हजारांपैकी ४ हजार घरांचा ताबा हा ऑक्टोबर २०२० रोजी देण्यात येणार होता, मात्र कोविड साथीमुळे हा ताबा देता आला नाही. त्यामुळे सिडकोने १ जुलैपासून या घरातील काही घरांचा ताबा देण्यास सुरुवात केली असून ३१ जुलैपर्यंत घरांचे सर्व हप्ते (सहा) व देखभाल खर्च भरणाऱ्या ग्राहकांनाच हा ताबा देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.


**ई-निविदा सुचना- प्रथम मुदतवाढ**

सहायक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, म.रा.
वांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रा (पूर्व) - मुंबई - ५१
दु.क्र. २६५१०९१२. ई - मेल - addclmum@yahoo.co.in

अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबईसाठी लागणारे
मिडीया
खरेदी करणेसाठी वार्षिक दर करार करणेबाबत. दोन लिफाफा पध्दतीनुसार(तांत्रिक व व्यापारी दरासंबधीच्या) उत्पादक, सोल सेलिंग एजंट, अधिकृत डीलर, सप्लायर, यांच्याकडून ऑन लाईन पध्दतीने दिनांक २०/०७/२०२१ ते ०५/०८/२०२१ या कालावधीत ई -निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात आल्या होत्या. त्यास अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे सदरची ई-निविदा दि.०५/०८/२०२१ ते दि.१३/०८/२०२१ सकाळी ११.०० पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर कालावधीत बिडींग डॉक्युमेंट पाहू शकता व डाऊनलोड करु शकता.
ई - निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर
दिनांक ०५/०८/२०२१ ते १३/०८/२०२१, सकाळी ११.०० पर्यंत.
(Bid submission) करु शकता.

दिनांक : ०५/०८/२०२१
ठिकाण : मुंबई

सहायक संचालक,
अन्न व औषध प्रशासन, प्रयोगशाळा,
मुंबई

डीजीआयपीआर/२०२१-२०२२/१४७९


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# राज्यात डेल्टा प्लस रुग्णांच्या संख्येत वाढ, आरोग्य मंत्र्यांची माहिती

**मुंबई (योगेश होळंब)-** राज्यात डेल्टा प्लस रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली आहे, अशी माहिती राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिली आहे. २१ वरून ही संख्या ४५ वर गेलेली आहे. यात पुरुष २७, स्त्रिया १८ असा समावेश आहे. रत्नागिरी, जळगाव, मुंबई इथे हे रुग्ण आहेत, तर औरंगाबाद, बीडमध्ये प्रत्येकी एक रुग्ण आहेत. त्यामुळे आता नागरिकांनी अधिक काळजी घ्यावी. प्रत्येक जिल्ह्यातील १०० नसुन घेतले जातात आणि त्यात बदल झाले आहेत का त्याची तपासणी केली जात असल्याची माहिती आरोग् मंत्र्यांनी दिली आहे. यात ४५



डेल्टाचे डेल्टा प्लस रुग्ण आढळले आहेत. मात्र घाबरण्याचे कारण नसल्याचे राजेश टोपेंनी सांगितले आहे. कारण डेल्टा आणि डेल्टा प्लसमध्ये फार काही फरक नसतो. या रुग्णांची आपण विशेष काळजी घेत आहोत. त्यांच्या संपर्कात कोण कोण आलंय त्याची बारकाईने माहिती घेत आहोत, अशी माहिती देखील यावेळी आरोग्य मंत्री राजेश टोपेंनी दिली आहे. कोविडची स्थिती मागील महिन्यांपासून सारखीच आहे. रुग्णसंख्या कमीही होत नाही आणि वाढतही नाही ती ६ ते ७ हजारच्या घरातच आहे. ११ जिल्ह्यातील पॉझिटिव्हीटी दर राज्याच्या सरासरीच्या जास्त आहे. राज्यात डेल्टा प्लस रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली आहे.

# मुंबई, ठाणे परिसरातील ५०० गृहप्रकल्प अडचणीत

**मुंबई (राजेश गायकवाड)-** मुंबई, ठाणे एमआयडीसी, नवी मुंबई आणि रायगड भागातील बांधकामे सुरू राहावीत, यासाठी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याभोवती असलेल्या पर्यावरण संवेदनशील पट्ट्यासंदर्भात जारी करण्यात आलेल्या अंतिम अधिसूचनेबाबत राज्य सरकार आणि केंद्र सरकारने हस्तक्षेप करून परिणामकारक व वेगाने पावले उचलावी, अशी विनंती महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज (एमसीएचआय) आणि कॉन्फर्डेशन ऑफ रिएल इस्टेट डेव्हलपर्स ऑफ इंडिया (क्रेडाई) या संघटनेतर्फे करण्यात आली आहे. नवीन अधिसूचना जारी करण्यास विलंब केला तर तब्बल पाच लाख कोटींच्या ५०० हून अधिक गृहप्रकल्पांवर त्याचा परिणाम होईल. या प्रकल्पांतर्गत काम करणारे हजारो बांधकाम मजूर बेरोजगार होतील, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. अनेक विकासकांना या बदललेल्या नियमांतर्गत वेळेत बांधकाम सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र मिळणार नाही, असा दावाही करण्यात आला आहे. मुंबईतील दहा किलोमीटरच्या परिघात १५ प्रभाग येतात. मुलुंड, चेंबूर, अंधेरी पूर्व, वांद्रे



पूर्व, परळ, माटुंगा इत्यादी महत्त्वाच्या परिसरांमधील विकासकांना बांधकाम करण्यात अडथळा येणार आहे. परिणामी खरेदीदारांना घरांचा ताबा देणेही कठीण होईल. मुद्रांक शुल्कातील सवलत लागू न केल्यामुळे मंदावलेल्या घरविक्रीला चालना देण्यासाठी या प्रकरणी केंद्र व राज्य सरकारने तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे. क्रेडाई-एमसीएचआयचे अध्यक्ष दीपक गोराडिया म्हणाले की, ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याच्या भोवतालचा दहा किमीचा बफर झोन तयार करण्याची पर्यावरण मंत्रालयाची अधिसूचना मंबई महानगरपालिकेने मान्य केल्याने सर्व बांधकामांवर परिणाम झाला आहे.

मुद्रांक शुल्कात सवलत दिली न गेल्याने बांधकाम व्यवसायात याआधीच नाराजी असून अधिसूचनेच्या विलंबामुळे पायाभूत सुविधा क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. याचा केवळ मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतीलच नव्हे तर मंबई महानगर क्षेत्रातील इतर भागांमध्येही परिणाम होणार आहे.

# हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय अड्डयांचे महामार्गावर रॅकेट!

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय शहर, उपनगरांसह महामार्गावर जोमाने फैलावत आहे. लॉकडाऊनची शिथिलता आणि महापुराच्या विळख्यातून सुटका होताच मुंबई, नागपूरसह कर्नाटक, गोवा आणि पश्चिम बंगालमधून युवतींना आणल्याचे समजते. अनैतिक मानवी व्यापाऱ्यात गुंतलेल्या आंतरराज्य टोळ्यांनी देहविक्रीचा बाजार पुन्हा मांडण्यास सुरुवात केली आहे.

पश्चिम महाराष्ट्रासह उत्तर कर्नाटकात छुप्या कुंटणखान्यांचे प्रमाण मोठे आहे. अनैतिक मानवी व्यापारी तस्करीत सक्रिय गुन्हेगारी टोळ्यांची जीवघेणी दहशत पोलिसांसाठीही डोकेदुखी ठरू लागली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असहाय्य सावज शोधायचे अन् वाममार्गाला लावून निष्पापांच्या आयुष्याचा बाजार मांडून त्यावर घसघशीत कमाईचा गोरखधंदा चालविला जात आहे.

लॉकडाऊनमुळे आर्थिक घडी विस्कळीत झाली



असली, तरी अनैतिक मानवी व्यापारातील उलाढाल वाढली आहे. एजंटांच्या साखळीतून तस्करांनी आर्थिक उलाढाल वाढवली आहे. सायंकाळनंतर रात्रीच्या चांदण्यात महामार्गावर हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय बहरू लागला आहे. वेश्या अड्डयाच्या दर्शनी बाजूला सन्नाटा दिसून येत असला, तरी पडद्याआड खुल्लमखुल्ला इष्काचा बाजार भरलेला असतो. पश्चिम महाराष्ट्रात हायप्रोफाईल वेश्या हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय रॅकेटमधून अनेक अल्पवयीन मुलींच्या आयुष्याचा चुराडा झाला आहे. जानेवारी २०१९ ते जुलै २०२१ या काळात ४० वेश्या अड्डयांचा पर्दाफाश झाला आहे. ७५ पीडित युवतींची सुटका झाली. असहाय्यतेचा फायदा घेत शरीरविक्रीस भाग पाडणाऱ्या २० महिलांसह ७४ एजंटांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. १७ वर्षाखालील ८ मुलींची कुंटणखान्यातून सुटका करण्यात आली आहे. हे प्रमाण धक्कादायक आहे. लॉकडाऊन काळात युवतींच्या असहाय्यतेचा गैरफायदा उठवित हायप्रोफाईल वेश्या व्यवसायाचा फंडा शहरासह जिल्ह्यात वाढू लागला आहे.

# अकरावी सीईटीत मराठी का नाही?

**मुंबई (विशाल कारंडे)-** अकरावी प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठीच्या अंतिम नोंदणीत इतर मंडळाच्या केवळ ३६ हजार विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली आहे, तर राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांची संख्या १० लाखांहून अधिक आहे. मग आता राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांची संख्या लाखांत आणि इतर मंडळाच्या



विद्यार्थ्यांची संख्या केवळ हजारात असताना मराठी विषय परीक्षेसाठी का नाही ? असा प्रश्न मराठीप्रेमी संघटना, पालक आणि मराठी शाळा संस्थाचालकांकडून विचारण्यात आला आहे. अकरावी प्रवेशासाठी प्रथमच घेतल्या जाणाऱ्या सीईटी परीक्षेसाठी राज्य मंडळासह इतर मंडळांच्या विद्यार्थ्यांचाही मोठ्या प्रमाणावर सहभाग असेल या कारणास्तव या परीक्षेतून मराठी हा विषय डावलण्यात आला. सीईटी परीक्षेत मराठी विषयाचा अंतर्भाव करावा यासाठी पुन्हा एकदा मराठी भाषाप्रेमी व मराठी शाळा संस्थाचालक संघाचे प्रतिनिधी यांनी शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांची भेट घेतली. सीईटीमध्ये मराठीला स्थान देण्याची मागणी केली आहे; मात्र सरकारने विचार करण्याची गरज आहे, मात्र दुर्लक्ष होत आहे, मराठीसाठी भूमिका नसल्याचेच मराठी शाळा संस्थाचालक संघाचे समन्वयक सुशील शेजूळ यांनी म्हटले आहे. सीईटी परीक्षेत मराठीला स्थान मिळावे याच्या समर्थनार्थ राज्यभर नोंदणीत अडीच हजार लोकांनी नोंदणी करून याला प्रचंड प्रतिसाद दिला आहे.

# ग्रामीण भागातील मुलींना मिळणार कौशल्य प्रशिक्षण –शंभूराजे देसाई

**पंढरपूर (जसबीरकौर भामरा)-** ग्रामीण भागातील मुलींतील कौशल्य विकसित होण्यासाठी त्यांना प्राधान्याने प्रशिक्षण द्यावे. या प्रशिक्षणामध्ये मुलींचा समावेश ३० टक्के राहील याबाबत कार्यवाही करावी अशा सूचना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे राज्यमंत्री शंभूराजे देसाई यांनी दिल्या. शासकीय



विश्रामगृह अकलूज येथे गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, पणन विभागांची जिल्हास्तरीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, जिल्हा उत्पादन शुल्क अधीक्षक रवींद्र आवळे, राज्य कर उपायुक्त सचिन बनसोडे, जिल्हा पणन अधिकारी भास्कर वाडीकर, प्र. जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एस. डी. शिंदे, उपकोषागार अधिकारी संजय सदावर्ते उपस्थित होते. राज्यमंत्री देसाई म्हणाले, ग्रामीण भागातील मुला-मुलींना सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास विभागाने प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. आरोग्य सेवेशी निगडित प्रशिक्षणाचा समावेश प्राधान्याने असावा. सोलापूर जिल्ह्याला अन्य राज्याची सीमा लागून आहे. सीमा भागातून होणारी चोरटी मद्य वाहतूक रोखण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने आवश्यकती कार्यवाही करावी. पणन विभागाने शेतकऱ्यांना व्यक्तिगत लाभाच्या योजना उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. राज्याच्या ग्रामीण भागातील पोलीस निवासस्थाने आणि पोलीस ठाण्यांच्या इमारत बांधकामातील विविध समस्या असून, पोलिसांना आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. ग्रामीण भागातील पोलीस वसाहतीचे प्रस्ताव तात्काळ पाठवावेत. प्रस्तावाचा पाठपुरावा करुन निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

# ड्रग्ज तस्कराने अटकेच्या कारवाईविरोधात केला हल्ला; एनसीबीचे दोन अधिकारी जखमी

**मुंबई (विशाल पाटील):** कोकेनच्या कोलंबिया ते मुंबई व्हाया ईथोपिया या आंतरराष्ट्रीय तस्करी रॅकेटचा सक्रिय सदस्य असलेल्या नायजेरीयन ड्रग्ज तस्कराला राष्ट्रीय अंमली पदार्थ नियंत्रण विभागाने (एनसीबी) नवी मुंबईतून शुक्रवारी पहाटे बेडया ठोकल्या आहेत. त्याच्याकडून १०२ ग्रॅम कोकेन



जप्त करण्यात आले आहे. या कारवाई दरम्यान एनसीबीचे दोन अधिकारी जखमी झाले आहेत. एनसीबीचे मुंबई विभागीय संचालक समीर वानखेडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, खारघर येथील सेक्टर ३० येथे आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्कर असल्याची माहिती मिळाली. पथकाने सापळा रचून स्टिफन सॅम्युअल उर्फ टोनी याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १०२ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले आहे. टोनी हा कोलंबिया ते मुंबई व्हाया ईथोपिया या आंतरराष्ट्रीय कोकेनच्या तस्करी रॅकेटचा सक्रीय सदस्य आहे. तो गेल्या अनेक दिवसांपासून एनसीबीच्या रडारवर होता. कोकेनच्या कोलंबिया ते मुंबई व्हाया ईथोपिया या आंतरराष्ट्रीय तस्करी रॅकेटचा स्टीपन हा सक्रीय सदस्य आहे. एनसीबीचे पथक गेल्या काही महिन्यांपासून मुंबई आणि दिल्ली येथे त्याचा शोध घेत होते. तो नुकताच दिल्लीवरून मुंबईत कोकेनचा पुरवठा करण्यासाठी आला होता. अखेर तो एनसीबीच्या हाती लागला.

# पोलीस ठाण्यांत मानवी हक्कांना सर्वाधिक धोका- सरन्यायाधीश

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** सरन्यायाधीश एन.व्ही. रमण यांनी एका कार्यक्रमाला संबोधित करताना देशातील पोलीस ठाण्यांमध्ये मानवाधिकारांच्या नियमांवर चिंता व्यक्त केली आहे. पोलीस ठाण्यांमध्ये मानवाधिकारांना सर्वात जास्त धोका आहे, विशेषाधिकार मिळवणाऱ्यांना थर्ड डिग्री ट्रीटमेंटपासून सोडले जात नाही, असे सरन्यायाधीश म्हणाले.

नॅशनल लीगल सर्व्हिसेस अथॉरिटी ऑफ इंडिया ने व्हिजन आणि मिशन स्टेटमेंट आणि NALSA साठी मोबाईल ॲप लाँच करण्यासाठी आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात सरन्यायाधीशांनी हे विधान केले आहे. मानवाधिकार आणि प्रतिष्ठा पवित्र असल्याचे सांगून सरन्यायाधीश म्हणाले की, मानवी हक्क आणि शारीरिक अखंडतेला सर्वात जास्त धोका पोलीस ठाण्यांमध्ये आहे. कस्टडीयल छळ आणि इतर पोलीस अत्याचार या समस्या आहेत, ज्या अजूनही आपल्या समाजात व्याप्त आहेत, एका ताज्या अहवालांनुसार विशेषाधिकारधारक देखील थर्ड-डिग्री ट्रीटमेंटपासून सुटलेले नाहीत. घटनात्मक घोषणा आणि हमी असूनही, पोलीस ठाण्यांमध्ये प्रभावी कायदेशीर प्रतिनिधीत्वाचा अभाव हे अटक किंवा ताब्यात घेतलेल्या व्यक्तींसाठी एक मोठी गैरसोय असल्याचे, सरन्यायाधीश एन.व्ही. रमण म्हणाले. सरन्यायाधीश म्हणाले की, पोलिसांचा अतिरेक रोखण्यासाठी कायदेशीर सहाय्याच्या घटनात्मक अधिकाराविषयी माहिती आणि मोफत कायदेशीर मदत सेवांच्या उपलब्धतेबाबत



प्रचार करणे आवश्यक आहे. प्रत्येक पोलीस स्टेशन/कारागृहात डिस्प्ले बोर्ड आणि आउटडोअर होर्डिंग्ज लावणे, हे या दिशेने एक मार्गदर्शक पाऊल ठरले. अत्यंत विशेषाधिकार प्राप्त आणि सर्वात कमजोर लोकांमध्ये न्यायापर्यंत पोहचण्यामधील अंतर कमी करणे आवश्यक आहे. आपल्या देशात प्रचलित असलेल्या सामाजिक-आर्थिक विविधतेचे वास्तव कधीही हक्क नाकारण्याचे कारण असू शकत नाही, असे सरन्यायाधीश आपल्या भाषणात म्हणाले.

सरन्यायाधीश म्हणाले, जर एक संस्था म्हणून, न्यायव्यवस्था नागरिकांचा विश्वास संपादन करू इच्छित असेल, तर आम्हाला प्रत्येकाला आश्वासन द्यावे लागेल की आम्ही त्यांच्यासाठी तेथे आहोत. प्रदीर्घ काळापासून, संवेदनशील लोकसंख्या न्याय व्यवस्थेपासून वंचित राहिली आहे. करोना महामारी असूनही, आम्ही आमच्या कायदेशीर मदत सेवा यशस्वीपणे सुरू ठेवण्यात यशस्वी झालो आहोत.

# दादरच्या टिळक पुलाची पुनर्बांधणी

**मुंबई (नितीन देवळेकर)-** दादर पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या ब्रिटिशकालीन टिळक पुलाची पुनर्बांधणी करण्यात येणार असून या कामाकरिता ६९ झाडे काढावी लागणार आहेत. त्यापैकी ४७ झाडे कापावी लागणार असून २२ झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने वृक्ष प्राधिकरणाकडे याबाबतचा प्रस्ताव पाठवला आहे. अंधेरीच्या गोखले पुलाच्या दुर्घटनेनंतर रेल्वेमार्गावरून जाणाऱ्या सर्वच पुलांची आयआयटीमार्फत संरचनात्मक तपासणी करण्यात आली होती. त्यात काही पुलांची संरचनात्मक दुरुस्ती तर काही पुलांची पुनर्बांधणी सुचवण्यात आली होती. त्यानुसार रेल्वेवरील ११ पुलांच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. 'महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन' (एमआरआयडीसी) प्राधिकरणामार्फत ही पुनर्बांधणी केली जाणार आहे. यामध्ये प्राधान्याने सहा रेल्वे रुळांवरील



पुलांचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्याअंतर्गत टिळक पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. पुनर्बांधणीच्या कामासाठी बांधकामाच्या आड येणारी ६९ झाडे काढावी लागणार आहेत. तसा प्रस्ताव एमआरआयडीसीतर्फे वृक्ष प्राधिकरणाकडे पाठवण्यात आला आहे.

# लस प्रमाणपत्र आता मिळणार व्हॉट्सॲपवर; 'अशी' आहे सहजसोपी प्रक्रिया

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा):** भारतात सध्या कोरोनाचं संकट उभं ठाकलं आहे. निव्वळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच कोरोना संसर्गाने धुमाकूळ घातला आहे. सध्यातरी कोरोना संसर्गावर कसल्याही प्रकारचं औषध उपलब्ध नाहीये. मात्र, वेगवेगळ्या देशांनी लस उपलब्ध करुन दिल्या आहेत. भारतात देखील १६ जानेवारीपासून लसीकरणास प्रारंभ करण्यात आला आहे. आतापर्यंत ५० कोटींच्या वर डोस दिले गेले आहेत. जॉन्सन अँड जॉन्सन या लशीला



नुकतीच आपत्कालीन वापरासाठी मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे आता भारतात पाच लशी उपलब्ध झाल्या आहेत. भारतात लसीकरण झालेल्या व्यक्तीला तत्काळ कोविन पोर्टलवरुन लस प्रमाणपत्र प्राप्त होते. मात्र, आता हे लस प्रमाणपत्र मिळणं आणखी सोपं होणार आहे. नेहमी संपर्कासाठी वापरल्या जाणाऱ्या व्हॉट्सॲपवर आता अवघ्या काही सेंकदात लस प्रमाणपत्र मिळणार आहे. याबाबतची माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडवीय यांनी दिली आहे.

# ..अन् पठ्ठ्याने टी-शर्टवरच छापला लसीकरणाच्या प्रमाणपत्राचा फोटो!

**मुंबई (राजेश गायकवाड)-** करोना रुग्णसंख्या घटल्याने निर्बंध शिथिल करण्यासाठी जनमताचा दबाव आणि लशीच्या दोन मात्रा घेतलेल्यांना रेल्वे प्रवासाला मुभा देण्याबाबत विचार करण्याच्या उच्च न्यायालयाच्या सूचनेनंतर अखेर १५ ऑगस्टपासून सर्वसामान्यांना उपनगरी रेल्वेतून प्रवासास परवानगी देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी केली. मात्र, त्यासाठी दोन लसमात्रा घेऊन १४ दिवस पूर्ण झाल्याची अट आहे. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यादिनापासून सर्वसामान्यांना रेल्वेसेवेची मुभा मिळणार आहे. रेल्वेसेवेसाठी राज्य सरकारच्या वतीने तयार करण्यात आलेल्या अॅपवर किंवा शहरातील महापालिकांच्या कार्यालयातून क्यूआर कोड मिळविणे आवश्यक असेल. अॅपवर लसीकरण पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर करावे



लागेल. त्यानंतरच परवानगी पत्र मिळेल. या वरूनच एका प्रसिद्ध कॉमेडीयन अतुल खत्री यांचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. अतुल खत्री हे प्रसिद्ध कॉमेडीयन आहेत. ते त्यांच्या सोशल मीडियावरून सध्या घडणाऱ्या घटनानंवरून विनोदी व्हिडीओ, फोटो, पोस्ट बनवून लोकांचं मनोरंजन करत असतात. काल लोकल ट्रेन बाबत घोषणा झाल्यावर अतुल खत्री यांनी रात्री त्यांच्या सोशल मीडियावरून एक फोटो शेअर केला. त्यांनी त्या फोटोमध्ये त्यांच्या कोविड लसीकरणाच्या प्रमाणपत्राचा फोटो छापला होता. त्यांनी 'काम आणि प्रवास पुन्हा सुरू झाला असल्याने आणि विमानतळ, हॉटेल्स अशा ठिकाणी माझे कोविड प्रमाणपत्र दाखवून कंटाळा आला आहे. म्हणून ही कल्पना तयार केली.' अश्या कॅप्शनसह तो फोटो पोस्ट केला. काही तासातच हा फोटो व्हायरल झाला.

# अंबरनाथचं प्राचीन शिवमंदिर श्रावणातही बंदच, भाविक यंदाही भोलेनाथाच्या दर्शनापासून वंचित

**ठाणे (तृप्ती गोरे)-** श्रावण महिन्याला आजपासून सुरुवात होत आहे. आज पहिला श्रावणी सोमवार आहे. शिवभक्तांसाठी शिवाची आराधना करण्याचा आजचा दिवस आहे. गेल्या अनेक वर्षांपासून श्रावण सोमवारी राज्यातील शिव मंदिरांमध्ये नाविकांची मांदियाळी पाहायला मिळते. शिवभक्तांसाठी श्रावण सोमवार हा वर्षातील सर्वात महत्त्वाचा सण असतो, त्यामुळे सर्व सिवभक्त आपल्या आराध्याचे दर्शन घेण्यासाठी राज्यातील अनेक प्राचीन आणि ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतात.

मात्र, सध्या महाराष्ट्रात कोरोना संकटामुळे अद्याप प्रार्थनास्थळं बंद ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे यंदाही शिवभक्त त्यांच्या प्रिय आराध्य देवतेच्या दर्शनाला मुकणार आहे. राज्यातील भगवान शंकराची सर्व मुख्य मंदिरं सामान्यांसाठी दर्शनासाठी बंद असल्याने सलग दुसऱ्या वर्षी शिवमंदिरांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अंबरनाथचं प्राचीन शिवमंदिरही यंदाच्या श्रावणात सलग दुसऱ्या वर्षी भाविकांसाठी बंदच राहणार यामुळे भाविकांचा सलग दुसऱ्या वर्षी हिरमोड झाला आहे.

तरीही पहिल्या श्रावणी सोमवारी अंबरनाथच्या प्राचीन शिवमंदिराबाहेर भाविकांनी गर्दी केलेली पाहायला मिळाली. मात्र कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मागील वर्षीपासून प्राचीन शिवमंदिर बंद ठेवण्यात आलं आहे. त्यामुळे भाविकांनी प्राचीन शिवमंदिराच्या प्रवेशद्वारावरच हार फुलं वाहून भोलेनाथाला प्रार्थना केली. यंदा तरी हे कोरोनाचं संकट कमी होऊ दे आणि मंदिर मंदिराची दारं उघडू दे, असं साकडं यावेळी भाविकांनी भोलेनाथाला घातलं.

मंदिर भाविकांसाठी बंद असलं, तरीही जुन्या अंबरनाथ गावातील शिव मंदिराचे परंपरागत पुजारी असलेल्या पाटील कुटुंबीयांनी सकाळीच मंदिरात विधीवत पूजाअर्चना आणि अभिषेक केला. यानंतर मंदिर पुन्हा एकदा बंद करण्यात आलं. दरम्यान कोरोनाचा



प्रादुर्भाव काहीसा कमी झाल्यामुळे ठाणे जिल्ह्यात दुकानांची वेळ रात्री १० वाजेपर्यंत करण्यात आली आहे. लोकल सुद्धा १५ ऑगस्ट पासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आता सरकारने मंदिरं उघडायला सुद्धा परवानगी द्यावी, अशी मागणी जुन्या अंबरनाथ गावातील मंदिराचे परंपरागत पुजारी विजय पाटील यांनी केली आहे.

अंबरनाथचं शिवमंदिर हे तब्बल ९६१ वर्ष जुनं असून शिलाहार राजांनी हे मंदिर उभारल्याची नोंद आहे. हे मंदिर स्थापत्यकलेचाही उत्कृष्ट नमुना मानलं जातं. युनेस्कोच्या वर्ल्ड हेरिटेज साईट्सच्या यादीतही अंबरनाथच्या प्राचीन शिवमंदिराच्या समावेश आहे. तर अतिशय जागृत देवस्थान अशी या मंदिराची संपूर्ण राज्यात ख्याती आहे. मागील वर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्यानं इतिहासात पहिल्यांदाच हे मंदिर श्रावण महिन्यात बंद ठेवण्याची वेळ आली. यानंतर आता कोरोनाचा प्रादुर्भाव काहीसा कमी झाला असला तरी मंदिरं उघडायला अजूनही शासनानं परवानगी दिलेली नाही. त्यामुळे यंदा सलग दुसऱ्या वर्षी प्राचीन शिवमंदिर भाविकांसाठी बंद ठेवले गेले आहे, अशी माहिती मंदिराचे परंपरागत पुजारी विजय पाटील यांनी दिली आहे.